स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड
सामाजिकशास्त्रेविद्याशाखे अंतर्गत पीएचडी (अर्थशास्त्र) या विषयातील पदवी करीताशोध प्रबंधाची रूपरेषा

“मराठवाड्यातीलभूमिहिन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा”

सन.

२०१०-२०२०

संशोधक

अविनाश लक्ष्मणराव नरवाडे

अर्थशास्त्र विभाग, सामाजिक शास्त्रे संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड.

मार्गदर्शक

डॉ.जे.एस.भोयर

प्राचार्यतथा संशोधक मार्गदर्शक

कै.बाबुराव पाटील कला, विज्ञान महाविद्यालय, हिंगोली.

मराठवाड्यातील भुमिहिन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा सन २०१० - २०२०

प्रास्तावना :

भारत हा विकसनशील देश आहे. भारतातील लोकसंख्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येचा भार दिवसेंदिवस कृषी क्षेत्रावर पडत आहे. देशातील एकूण श्रमशक्तीच्या५८.२ टक्के भाग कृषी क्षेत्रावर आधारित आहे. तसेच बहुसंख्य लोक त्या क्षेत्रावर आधारित उद्योग धंद्या पासून आपली उपजीविका भागवीत असते. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या दृष्टीने कृषीक्षेत्राची भूमिका महत्त्वपूर्ण असल्यामुळे कृषीक्षेत्राच्या विकासावर भारताचा सर्वांगिन विकास अवलंबून असल्याचे दिसून येते. कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी कृषी क्षेत्रातील अनेक घटक जबाबदार असतात. त्यातीलच महत्त्वाचा घटक म्हणजे शेतमजूर हा होय. परंतु भारतात कृषी क्षेत्रातील शेतमजूर हा घटक विकासापासून दूर आहे. त्यांना मिळणारी कमी मजुरी, बेकारी, अर्धबेकारी,अनियमित रोजगार तंत्रज्ञान कौशल्याचा अभाव पर्यायी रोजगारांच्या संधीचा अभाव यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा खालावलेला आहे. त्यामुळे त्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागतो. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती मध्ये भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण अधिक असून ते असंघटित आहेत.

भारतातील शेतमजुरांना प्रामुख्याने विशिष्ट हंगामात शेतीची कामे करावी लागतात. शेतातील कामे हंगामी स्वरूपाचे असतात. पेरणीच्या व कापणीच्या हंगामात शेतमजुरांकरिता असणारी मागणीउच्च पातळीवर असते.कृषीक्षेत्रात रोजंदारीवर घेतल्या जाणाऱ्या श्रमिकांकरिता मागणी सापेक्षतेने मर्यादीत असते. कारण जमीन मालक आणि त्याच्या कुटुंबातील अन्य व्यक्ती आपल्या शेतीवर सर्वसाधारणपणे स्वतः काम करतात. कोरडवाहू भागात श्रमिकांची असणारी मागणी कमी असते तर ओलिताखालील श्रमिकांची असणारी मागणी जास्त असते.

गेल्या अनेक वर्षात भारतातील श्रमिकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे. या परिस्थितीला अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यामध्ये ग्रामीण समाजाचे विघटन धारणक्षेत्राच्या आकारात बदल हस्तव्यवसायाचा व कुटिर उद्योगाचाह्रास ग्रामीण लोकसंख्येत वाढ, किफायतशीर रोजगाराच्या बिगर शेतकी रोजगाराचा अभाव भारतातील श्रमिकांची संख्या १९५१मध्ये २७३लाख,१९६१मध्ये ३१५लाख,१९७१मध्ये ५०४लाख,१९८१मध्ये५५५ लाख,१९९१मध्ये ७१२ लाख, २००१मध्ये १०८५ लाख, २०११मध्ये १४४३ लाख याप्रमाणे होती. सन १९५१ पासुन ते२०११ पर्यंतच्या जनगणनेवरून असे आढळून येते की,भारतातीलश्रमिकांच्या संख्येतफार मोठी वाढ घडून आली आहे.

भारतातील निरनिराळ्या घटक राज्यातील शेतमजुरांची स्थिती भिन्न असली तरी एकंदरीत पाहता भारतातील सर्वचशेतमजुरांची स्थिती औद्योगिक कामगारांच्या स्थिती पेक्षा बऱ्याच कमी प्रतीची आहे. भारतातील शेतमजूर अनेक भागात विखुरलेले आहेत. अशा

शेतमजुरांच्या स्थितीचा अभ्यास करण्याकडे आतापर्यंत फारसे लक्ष दिले गेले नाही. भारत सरकारच्या श्रम मंत्रालयाने केलेल्या सर्वेक्षण अहवालावरून आपल्याला भारतातील शेतमजुरांच्या स्थितीविषयी कल्पना येते. भारतातील शेतमजुरांना मिळणारा मोबदला इतर क्षेत्रापेक्षा अजूनही अल्पच आहे.

कृषी क्षेत्रातील श्रमिकांपेक्षा औद्योगिक क्षेत्रातील श्रमिक संघटित असतात. त्यामुळे त्यांना मिळणारा मोबदला हा जास्तच असतो. शेतमजूर असंघटित असल्याचे कारण अनियमित प्रवृत्ती,निरक्षरता,अज्ञानइत्यादी बाबीमुळेशेतमजुरांना आपला उद्देश साध्य करून घेता येत नाही.सन २००४-०५ मध्ये नमुना पाहणीद्वारे (NSS) संघटित आणि असंघटित या दोन्ही क्षेत्रांमध्ये देशातील एकूण४५.९ कोटी लोक कार्यरत होते. यांपैकी २.६ कोटी संघटितक्षेत्रात आणि ४३.३ कोटी असंघटित क्षेत्रांमध्ये कार्यरत होते.

असंघटित क्षेत्रातील ४३.३ कोटी श्रमिकांमधील २१.६५ कोटी शेतमजूर हेकृषी क्षेत्रांमध्ये कार्यरत होते. तर २१.६५कोटी वस्तू निर्माण क्षेत्रांमध्ये कार्यरत होते. एकंदरीत असे दिसून येते की भारतातील जास्तीत जास्त श्रमशक्ती ही असंघटित क्षेत्रामध्ये कार्यरत आहे.

१९७१ मध्ये महाराष्ट्रात सरासरी एका कुटुंबाकडे ४.५० हेक्टर जमीन होती.२०१५ मध्ये हे प्रमाण १.५० हेक्टर पर्यंत खालावलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात घट होऊन शेतमजुरांच्या संख्येत वेगाने वाढ झालेली दिसुन येते. महाराष्ट्रामध्ये २००१ मध्ये १ कोटी ८ लाख एवढी भूमिहीन शेतमजुरांची संख्या होती.२०११मध्ये त्यात वाढ होऊन १ कोटी 34 लाख एवढी झाली.एकीकडे भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असताना शेतातील मिळणाऱ्या रोजगारामध्ये मात्र घट होत आहे.२०१०-२० मध्ये कृषिक्षेत्रात ४२.६ टक्के शेतमजुरांना रोजगार मिळत होता. तो २०२०-२१मध्ये ४१.६टक्के एवढा कमी झाला.

अभ्यास विषयाचि निवड

संशोधनाला सुरुवात करण्याअगोदर संशोधनाचा विषय निवडणे आवश्यक असते.म्हणूनअभ्यासासाठी“मराठवाड्यातील भुमिहिन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा सन. २०१० - २०२०” हा विषय निवडण्यात आला आहे.

संशोधनाचे महत्त्व

भारतातील कृषी क्षेत्रातील श्रमिकांची संख्या ही सर्वात जास्त आहे. भारत सरकारच्या श्रम आणि रोजगार मंत्रालयाच्या २०१९ - २०२० च्या अहवालानुसार जवळपास ६४टक्के पेक्षा जास्त लोकसंख्याकृषी क्षेत्रात कार्यरत आहेत. जे की असंघटित क्षेत्रात मोडतात. त्यातिल असंघटित क्षेत्रातील मजुरांना विविध प्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागतो. आणि हे मजूर भूमिहीन शेतमजूर असतील तर त्यांची स्थिती आणखीनच हलाखीची असल्याचे दिसून येते. या विषयांतर्गतहिंगोलीजिल्ह्यातील शेतमजुरांना शेतीमध्ये पुरेसा रोजगार मिळतो का? मिळत असल्यास त्याचे स्वरूप कसे आहे ? त्यांना किती रुपये मजुरी मिळते ? मिळणारी मजुरी पुरेशी आहे का? शेतमजुरांचे राहणीमान कसे आहे? तसेच शेतीतील नवीन तंत्रज्ञानाचा शेतमजूराच्याजिवनावर काय परिणाम झाला? महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत शेतमजुरांना मिळणारी मजुरी किती? या योजनेअंतर्गत किती दिवस काम मिळतात? इत्यादी प्रश्नाचे मूळ शोधण्याकरिता“मराठवाड्यातील भुमिहिन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा सन. २०१० - २०२०” हा विषय निवडण्यात आला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

१.हिंगोलीजिल्ह्यातीलभूमिहीन शेतमजुरांचा अभ्यास करणे.

२.हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

३.हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

४.हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.

५.हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्याकुटुंबाचा शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके

१.मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत वाढीचा किंवा घटीचाअभ्यास करणे.

२.हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत घट वा वाढ झाली आहे यांचा अभ्यास करणे.

३.हिंगोलीजिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

४. हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक स्थितीचाअभ्यास करणे.

५.हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या राहणीमानात वाढ किंवा घट झाली यांचाही अभ्यास करणे.

६. हिंगोली जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांना भेडसावणाऱ्यासमस्याचा अभ्यास करून त्यावर उपाययोजना सुचविणे.

७. हिंगोली जिल्ह्यातीलअसंघटित कामगारांचे राहणीमान उंचावण्यासाठीच्या उपाय योजनांचा अभ्यास करणे.

संशोधनाची मर्यादा

संशोधन कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी संशोधकाला काही मर्यादा किंवा सीमा असणे महत्वाचे असते. ज्याप्रमाणे अथांग समुद्रात जहाजाचे होकायंत्र काम करत नसेल तर जहाज निश्चित मार्गापासून भरकटत असते. त्याचप्रमाणे संशोधकाला मर्यादा नसेल तर संशोधन कार्य देखील भरकटत असते. या संशोधन कार्यामध्ये “मराठवाड्यातील भुमिहिन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा सन. २०१० - २०२०”असा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ही या संशोधनाची मर्यादा आहे.

संशोधन पद्धती

“मराठवाड्यातील भुमिहिन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ हिंगोली जिल्हा सन. २०१० - २०२०” या विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनाचा आधार घेण्यातयेईल.याकरिता प्राथमिक आधार सामग्रीत सहेतुक नमुना निवड पद्धतीनुसार हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्यातील ५ गावाची निवड करून प्रत्येक गावातून २०श्रमिकांची निवड करण्यात येईल.हिंगोली जिल्ह्यातील एकूण

५००श्रमिकांची निवड माहिती संकलनासाठी करण्यात येईल. याबरोबरच माहिती संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखत आणि अनुसूचीचा आधार घेण्यात येईल.तसेच संशोधनासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा आधार घेण्यात येईल.

संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधन कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी या विषयाची विभागणी सात प्रकारांमध्ये करण्यात आली आहे. ते पुढील प्रमाणे पाहता येईल.

प्रकरण पहिले :प्रस्तावना : औरंगाबाद मराठवाड्याची राजधानी व प्रमुख औद्योगिक शहर आहे. त्याच्या ऐतिहासिक वास्तू लेणी त्याच्या साठी प्रसिद्ध आहे. औरंगाबाद येथून मुंबई-दिल्ली व देशातील इतर शहरांमध्येजाण्यासाठी रस्ते, रेल्वे, हवाई मार्ग आहेत. या जिल्ह्यात बीबी का मकबरा अजिंठा वेरूळ लेण्या दौलताबाद किल्ला आणि जायकवाडी धरण आहे. पर्यटन स्थळे आणि धार्मिक स्थळे या जिल्ह्यात आहेत. येथे औरंगाबाद प्रशासकीय विभागाचे मुख्यालय आहे या जिल्ह्याच्या दक्षिणेकडून गोदावरी ही नदीवाहते.

प्रकरण दुसरे:हिंगोली जिल्ह्याची ऐतिहासिक माहिती.

प्रकरण तिसरे :संशोधन साहित्याचा आढावा.

प्रकरण चौथे: हिंगोली जिल्ह्यातील कृषी क्षेत्रावर काम करणाऱ्या भूमीहिन शेतमजुरांचा अभ्यास.

प्रकरण पाचवे: भूमिहीन शेतमजूर व असंघटित कामगारासाठीच्या सरकारी योजनांचा अभ्यास करून त्या योजनांचा असंघटित कामगारांच्या जिवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

प्रकरण सहावे : हिंगोली जिल्ह्यातील भूमिहिन शेतमजुरांच्या तसेच संघटित कामगारांचा आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, परिस्थितीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारशीउपाययोजना.

संदर्भसूची

१. मोहनभाई कुडारिया, वर्षभरात १२३६० शेतकरी व शेतमजुरांच्या आत्महत्या कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री दैनिक दिव्य मराठी ०५ डिसेंबर २०१५ पृष्ठ क्रमांक. ०६

२. पवार प्रकाशन विखंडित शेतकरी वर्गाचे वाली कोण दैनिक लोकसत्ता १५ जुलै २०१६ पृष्ठ क्रमांक.०७

३. ब्राम्हे सुलभा, महाराष्ट्रातील शेतमजूर, प्रकाशन अनिल अवचार फुले समता प्रतिष्ठा, भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, पुणे, प्रथम आवृत्ती मार्च १९८३ पृष्ठ क्रमांक. १३

४. register general and census commissioner india 2011

५. Government of India Ministry of Labour and Employment annual report 2010-11 printed and designed by SMAT from P.N. 02

६. Horron sajiad, employment of landless labour B.R.Ambedkar publishing New Delh P.N. 04

७. Parmar H.Ramesh an empirical study of status of women agriculture in India paripex Indian Journal of research P.N. 48

८.Karmar Dharma, cast and landless in South India Delhi Oxford University Press New Delhi P.N. 76

संशोधक

अविनाश लक्ष्मणराव नरवाडे

अर्थशास्त्र विभाग, सामाजिक शास्त्रे संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा
विद्यापीठ नांदेड

मार्गदर्शक

डॉ.जे.एस.भोयर

प्राचार्य तथा संशोधक मार्गदर्शक
कै. बाबुराव पाटील कला, विज्ञान
महाविद्यालय, हिंगोली.